| | |
|---|---|
| MHKO120003652010 | खटला दाखल तारीख – ०४/०९/२०१० |
| | खटला नोंदणी तारीख – ०४/०९/२०१० |
| | खटला निकाल तारीख –०४/०६/२०२६ |
| | कालावधी – १५ वर्षे ०९ महिने ०० दिवस |

**भाग अ***

**(न्यायनिर्णयाचे शिर्षक पृष्ठ)**

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१)]**

**<u>नि.क्र.२१३/ब</u>**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, गारगोटी यांच्या न्यायालयात,**

**पिठासिन अधिकारी : श्री. एन. डी. रुद्रभटे**

| | |
|---|---|
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र.–५३/२००९ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०४/०६/२०२६ |
| प्रकरण क्रमांक | **नियमित फौजदारी खटला क्र.–४८/२०१०** |
| तक्रारकर्ता/अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत/द्वारा पोलीस ठाणे अधिकारी, भुदरगड.<br>(फिर्यादी श्रीपाल तवनाप्पा मगदुम) |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **श्री. डी. ए. बनसोडे**<br>(सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता) |
| आरोपी | **आरोपी क्र.१ श्रीपतराव विठ्ठल म्हांगोरे** (मयत)<br>**आरोपी क्र.२ दत्तात्रय महादेव विभुते** (मयत)<br>**आरोपी क्र.३ गुरुदत्त श्रीपतराव म्हांगोरे**<br>वय वर्षे –४४, व्यवसाय– नोकरी,<br>रा. शेणगाव, ता.भुदगरड, जि. कोल्हापूर |

| | |
|---|---|
| | **आरोपी क्र.४ नागेश कृष्णाजी ताम्हणकर (मयत)**<br>**आरोपी क्र.५ मधुकर मारुती कुंभार, (मयत)**<br>**आरोपी क्र.६ गुंडू गणपती कोरगावकर (मयत)**<br>**आरोपी क्र.७ सुरेश राजाराम कालेकर,**<br>वय वर्षे – ६५, व्यवसाय – टेलरिंग,<br>**आरोपी क्र.८ सुंदर शिवाजी जाधव,**<br>वय वर्षे – ३६, व्यवसाय – नोकरी,<br>**आरोपी क्र.९ सावित्री पंडीत साळोखे,**<br>वय वर्षे – ४२, व्यवसाय – घरकाम,<br>**आरोपी क्र.१० शोभाताई ज्ञानदेव आमनगी**<br>वय वर्षे – ४०, व्यवसाय – घरकाम,<br>**आरोपी क्र.११ अशोक पांडुरंग मांडे,**<br>रा. शेणगाव, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर<br>वय वर्षे – ३२, व्यवसाय – नोकरी व शेती,<br>रा. मडिलगे खुर्द ता. भुदरगड, जि. कोल्हापूर |
| आरोपी तर्फे विधिज्ञ | **आरोपी क्र.१ ते ७, ९ ते ११ कडून श्री. के. व्ही. पाटील व आरोपी क्र.८ कडून श्री. डी. डी. पाटील** |

## भाग ब*

## [फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२)]

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | ११/०५/१९९६ ते ०४/०१/२००८ |
| प्रथम खबरी अहवाल | ०२/०६/२००९ |

| | |
|---|---|
| दोषारोप पत्र दाखल तारीख | ०४/०९/२०१० |
| दोषारोप ठेवलेची तारीख | १३/०९/२०२२ |
| पुरावा सुरु झालेची तारीख | १०/०१/२०२३ |
| न्यायनिर्णय करीता ठेवलेली तारीख | – |
| न्यायनिर्णय तारीख | ०४/०६/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | – |

## आरोपीचा/आरोपींचा तपशील

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन मुक्त तारीख | दोषारोपीत गुन्हा | निर्दोष की दोषसिद्ध | ठोठाविलेली शिक्षा | फौ.प्र.सं. चे कलम ४२८ च्या उद्देशासाठी संपरिक्षा अवधित व्यतीत केलेली बंदी अवधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्रीपतराव विठ्ठल म्हांगोरे (मयत) | – | – | – | – | – | – |
| २. | दत्तात्रय महादेव विभुते (मयत) | – | – | – | – | – | – |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३. | गुरूदत्त श्रीपतराव म्हांगोरे | १६/०६/२००९ | ०२/०१/२०१० | भा.दं.वि.क.४०६, ४०८, ४२०, ४२६, ४६८, ४७१, ३४ | निर्दोष | निरंक | निरंक |
| ४. | नागेश कृष्णाजी ताम्हणकर (मयत) | – | – | – | – | – | – |
| ५. | मधुकर मारुती कुंभार (मयत) | – | – | – | – | – | – |
| ६. | गुंडू गणपती कोरगांवकर (मयत) | – | – | – | – | – | – |
| ७. | सुरेश राजाराम कालेकर | १६/०६/२००९ | २५/०६/२००९ | भा.दं.वि.क.४०६, ४०८, ४२०, ४२६, ४६८, ४७१, ३४ | निर्दोष | निरंक | निरंक |
| ८. | सुंदर शिवाजी जाधव | १६/०६/२००९ | ०२/०१/२०१० | भा.दं.वि.क.४०६, ४०८, ४२०, ४२६, ४६८, ४७१, ३४ | निर्दोष | निरंक | निरंक |
| ९. | सावित्री पंडित साळोखे | १६/०६/२००९ | १८/०६/२००९ | भा.दं.वि.क.४०६, ४०८, ४२०, ४२६, ४६८, ४७१, ३४ | निर्दोष | निरंक | निरंक |
| १०. | शोभाताई | १६/०६/२००९ | १८/०६/२००९ | भा.दं.वि.क.४० | निर्दोष | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ज्ञानदेव आमनगी | | | ६, ४०८, ४२०, ४२६, ४६८, ४७१, ३४ | | | |
| ११. | अशोक पांडुरंग मांडे | १६/०६/२००९ | २५/०६/२००९ | भा.दं.वि.क.४०६, ४०८, ४२०, ४२६, ४६८, ४७१, ३४ | निर्दोष | निरंक | निरंक |

**भाग क***

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)]**

अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

## (अ) अभियोग पक्षातर्फे साक्षीदार –

| क्र. | साक्षीदाराचे नांव | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | श्रीपाल तवनाप्पा मगदुम (नि.क्र.१३६) | फिर्यादी साक्षीदार |
| २. | दिनकर महादेव पोवार (नि.क्र.१४५) | पंच साक्षीदार |
| ३. | शैलेश फिलीप बारदेस्कर (नि.क्र.१४७) | पंच साक्षीदार |
| ४. | शशिकांत दत्तात्रय ढेरे (नि.क्र.१४९) | साक्षीदार |
| ५. | विजय ईश्वरा भोसले (नि.क्र.१५०) | साक्षीदार |
| ६. | हिंदूराव कृष्णा सावंत (नि.क्र.१५१) | साक्षीदार |
| ७. | दत्तात्रय बळवंत साळोखे (नि.क्र.१५३) | साक्षीदार |
| ८. | गोपाळ आकाप्पा कुंभार (नि.क्र.१५५) | साक्षीदार |
| ९. | सुनिल प्रभाकर नार्वेकर (नि.क्र.१५६) | साक्षीदार |
| १०. | दत्तात्रय विश्वनाथ भापकर (नि.क्र.१७६) | तपासी अधिकारी |

| | | |
|---|---|---|
| ११. | राजेंद्रकुमार बळीराम शेंडे (नि.क्र.१८४) | पोलीस अधिक्षक |

**(ब) <u>बचावप क्षातर्फे साक्षीदार</u> – निरंक**

**(क) <u>न्यायालय तर्फे साक्षीदार</u> – निरंक**

<u>अभियोग पक्ष/ बचाव पक्ष/न्यायालय निशाणी क्रमांक</u>

**(अ) <u>अभियोग पक्षातर्फे निशाणी –</u>**

| निशाणी क्र. | निशाणीचे वर्णन | कोणत्या साक्षीदारामार्फत सिद्ध केले |
|---|---|---|
| १६२ | लेखा परीक्षणाचा आदेश | अभियोग पक्ष क्र.१ |
| १६३ | ताळेबंद मेमो | अभियोग पक्ष क्र. १ |
| १६५ | ऑडीट रिपोर्ट | अभियोग पक्ष क्र. १ |
| १६६ | संस्थेतील संचालक मंडळाची यादी | अभियोग पक्ष क्र. १ |
| १६७ | फिर्याद | अभियोग पक्ष क्र. १ |
| १४६ | पंचनामा | अभियोग पक्ष क्र.२ |
| १४८ | दि.०३/०६/२००९ रोजीचा जप्ती पंचनामा | अभियोग पक्ष क्र.३ व १० |
| १५२ | दि.२०/०७/२००९ रोजीचा जप्ती पंचनामा | अभियोग पक्ष क्र.६ व १० |
| १७७ | महालक्ष्मी नागरी पतसंस्थेने गुंतवणूक केल्याबाबतचे पत्र | अभियोग पक्ष क्र. १० |
| १७८ | श्री. बी. जी. देसाई सह. पतसंस्थेकडील पत्र | अभियोग पक्ष क्र. १० |

| | | |
|---|---|---|
| १७९ | श्री. गजानन नागरी सह. पतसंस्थेस पाठविलेले पत्र | अभियोग पक्ष क्र. १० |
| १८० | श्री. पांडुरंग सहकारी पतसंस्थेला पाठविलेले पत्र | अभियोग पक्ष क्र. १० |
| १८१ | श्री. पांडुरंग नागरी सह. पतसंस्थेकडून आलेले पत्र | अभियोग पक्ष क्र. १० |
| १८५ | अटक पंचनामा | अभियोग पक्ष क्र. ११ |

**(ब) बचाव पक्षातर्फे निशाणी – निरंक**

**(क) न्यायालय पक्षातर्फे निशाणी – निरंक**

**(ड) भौतिक वस्तु –**

| भौतिक वस्तु/मुद्देमाल क्रमांक | भौतिक वस्तु/मुद्देमाल वर्णन | कोणत्या साक्षीदारामार्फत सिद्ध |
|---|---|---|
| १. | लेखापरिक्षण अहवाल व अन्य रजिस्टर | फिर्यादी व तपास अधिकारी |

## न्यायनिर्णय

( घोषित दिनांक ०४/०६/२०२६ )

आरोपीवर भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ४०६, ४०८, ४२०, ४२७, ४६८, ४७१, ३४ अन्वये गुन्हा केल्याबाबत दोषारोप आहे.

**अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे –**

२. फिर्यादी श्रीपाल मगदुम हे महाराष्ट्र शासनाच्या लेखा परीक्षण विभागात द्वितीय अप्पर लेखापरीक्षक सहकारी संस्था कोल्हापूर या पदावर काम करतात. सहकारी संस्थांचे हिशोब त्यांचे दप्तराचे लेखापरीक्षण करणे व त्याचा अहवाल संस्थांना

व निबंधकांना सादर करणे हे त्यांचे कर्तव्याचा भाग आहे. दि.०८/०८/२००७ रोजीचे मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कोल्हापूर यांनी श्री. महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्या., शेणगाव, ता. भुदरगड, जि.कोल्हापूर या संस्थेचे दि.०१/०४/२००२ ते दि.३१/०३/२००३ या कालावधीचे लेखापरिक्षण करण्याचा आदेश पारित केला त्यानुसार संबंधित संस्थेचे लेखापरिक्षण हे दि.२५/०१/२००८ रोजी फिर्यादीने पूर्ण केले. त्यावेळी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१(२) चे पोटकलम १(३) अन्वये कार्यकारी मंडळ यांनी अदा केलेल्या कर्जाची व जागा विक्री केलेल्या कागदपत्रांची छाननी फिर्यादीने केली. त्यावेळी फिर्यादीला असे निदर्शनास आले की, सहकार कायद्यातील तरतुदीनुसार व संस्थेच्या पोटनियमानुसार संचालकांची विश्वस्त म्हणून काही कर्तव्य व जबाबदा–या होत्या व आहेत.

३. फिर्यादी यांनी लेखापरिक्षण केल्यानंतर विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था कोल्हापूर यांनी दि.२५/०३/२००८ रोजी आदेश पारित केला व संबंधित पतसंस्था ही भेडसगाव नागरी सहकारी संस्था मर्या., भेडसगाव या संस्थेमध्ये विलीनीकरण करण्यात आले, परंतु, संबंधित आदेशामध्ये अट क्र.३ नुसार विलीनीकरणाच्या आदेशाच्या दिनांकाच्या पूर्वीपासून झालेल्या गैरव्यवहाराची जबाबदारी ही श्री. महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्या., शेणगाव याचे पदाधिकारी संचालक व व्यवस्थापकांची राहिल अशी अट त्यामध्ये होती व त्यानुसार

आरोपी क्र.१ ते ११ हे जबाबदार आहेत. आरोपी क्र.१ हे संबंधित संस्थेचे चेअरमन आहेत, आरोपी क्र.२ ते ८ हे संबंधित संस्थेचे संचालक, आरोपी क्र.९ व १० संबंधित संस्थेच्या संचालिका व आरोपी क्र.११ हे संबंधित संस्थेचे मॅनेंजर आहेत. दि.३१/०३/२००३ अखेर एकूण ९२.९८ लाख कर्ज असून ते १०० टक्के थकित राहिलेले कर्ज आहे. संचालक मंडळाने कर्ज अदा करताना अपुरे कागदपत्र घेतले व कर्जाकामी जामीनदार न घेता, कारणाचा तपशील न घेता, परत फेडीची क्षमता अथवा कर्जदार अथवा जामीनदाराची पत, तारण मालाचे मुल्यांकन या बाबी विचारात घेतल्या नाहीत. बहुतांशी कर्ज प्रकरणे ही सन १९९७/९८ व सन १९९८/९९ या कालावधीमध्ये  करण्यात आली. व्यक्तीगत हितसंबंध जोपासून पदाचा गैरवापर करुन संचालक व नातेवाईक यांना कर्ज वाटप करुन ते थकित होऊन वसुलीची कारवाई झाली नाही. शाखा कमिटीने मंजूर केलेल्या कर्जास प्रधान कार्यालयाची अथवा संचालक मंडळाची मंजूरी घेतली नाही व खालीलप्रमाणे कर्ज अदा केले.

| अ.क्र. | कर्जदाराचे नाव | कर्ज रक्कम | अदा तारीख | कर्ज प्रकार जामीन | कारण तपशील | दि.३१/०३/२००३ रोजी बाकी असलेली कर्जाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | सुरेश राजाराम कालेकर | ५,०००/– | १७/०८/१९९९ | जामीनकी | नाही | ११,६९७/– |
| | ब) राधाबाई सुरेश कालेकर (संचालकाची पत्नी) | २९,०००/– | ०६/०७/२००२ | मुदत तारण | अपूर्ण | ४४,५६८/– |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २. | शशिकांत दत्तात्रय ढेरे | ९०,०००/– | १५/०६/ १९९८ | मुदत तारण | नाही | १,९३,७९७/– |
| ३. | अशोक भिकाजी दपोल | ८२,८०६ | १६/०७/ २००१ | मुदत तारण | नाही | १,०२,२७८/– |
| ४. | सागर किस्तोबा बारदेस्कर | ५५,०००/– | १५/०६/ २००० | मुदत तारण | नाही | ९३,२१९/– |
| ५. | गणपती भिकाजी कांबळे | १७,०००/– | ३१/०३/ १९९७ | जामीनकी | नाही | ४४,७७५/– |
| ६. | नौशाद इनाम नाईकवडे | ३,०००/– | १९/०५/ १९९६ | जामीनकी | नाही | १३,७८५/– |
| ७. | दत्तात्रय चिंतामणी पाटील | ५०,०००/– | ३१/०३/ १९९९ | मुदत तारण | अपूर्ण | ५१,६६८/– |
| ८. | अशोक ईश्वरा बेली | ४७,०००/– | ३१/०३/ १९९९ | मुदत तारण | नाही | १,१७५८१/– |
| ९. | सुनिल प्रभाकर नागवेकर | ३७,०००/– | ३१/०३/ १९९९ | मुदत तारण | दस्त उपलब्ध नाही | ४९,६०१/– |
| १०. | लतिफा लक्ष्मण जानवे | २२,०००/– | ०३/०४/ १९९७ | पगार तारण | नाही | ७२,३४५/– |
| ११. | प्रतिभा रघुनाथ जोशी | ३०,०००/– | २९/०७/ १९९७ | पगार तारण | नाही | १,९३,७९७/ – |
| | | | | | | |

४. तसेच कर्जदार प्रतिभा जोशी यांनी त्यांचे अर्जासोबत दिलेले पगारपत्रक खोटे दिल्याचे निदर्शनास येऊन देखील त्यांच्या विरुद्ध आरोपींनी कोणतीही कारवाई केलेली नाही. महाराष्ट्र सहकारी संस्था १९६० चे कलम ७० व नियम ५४ व ५५

नुसार संस्थेच्या निधीची गुंतवणूक ही जिल्हा मध्यवर्ती बँकेत करणे आवश्यक असताना सहकार खात्याची मान्यता न घेता व ठेवीदारांचे हित विचारात न घेता अन्य सहकारी पतसंस्थेमध्ये एकूण रक्कम रु.७,६३,०००/- एवढ्या रकमेची गुंतवणूक संबंधित संस्थेने केली. मौ. शेणगाव, ता. भुदरगड येथील सि.स.नं.१७६ मधील १५२४.०२ एवढे क्षेत्र हे दि.२६/०१/२००३ रोजी ठराव क्र.५ नुसार बेकायदेशीररित्या लिलावामध्ये विक्रीसाठी लावले व त्या लिलावामध्ये खालील व्यक्तींनी खालीलप्रमाणे हजेरी लावली.

| **अ.क्र.** | **नाव** | **बोली क्र.१** | **बोली क्र.२** | **बोली क्र.३** |
|---|---|---|---|---|
| १. | गोपाळ आकाप्पा कुंभार | १५,०००/- | २९,०००/- | ४९,०००/- |
| २. | विजय ईश्वरा भोसले | सभावृत्तात आकडे मांडले नाहीत. | | |
| ३. | ज्ञानदेव तुकाराम मुंगळे | २२,०००/- | ३१,०००/- | ४२,०००/- |
| ४. | राजाराम शंकर कुंभार | १०,०००/- | ३५,०००/- | ४५,०००/- |
| ५. | शंकर हरी शिंदे | २५,०००/- | ४०,०००/- | ४४,०००/- |

५. सदर लिलावामध्ये श्री. विजय ईश्वरा भोसले यांचे लाभामध्ये लिलाव मंजूर आल्याचा ठराव मंजूर करण्यात आला व त्यानुसार दि.१२/०२/२००३ रोजीच्या किर्दीला ३७,२८५/- एवढी रक्कम रोखीने जमा करुन घेतली. संबंधित रक्कमेच्या चलनावर रक्कम भरणा-या व्यक्तीची सही नाही. ठरावाला सुचक अनुमोदक नाहीत. विक्रीस संबंधित खात्याची मान्यता नाही. प्रत्यक्षात सर्वात जास्त लिलावाची बोली ही ४९,०००/- एवढ्या रकमेसाठी आली होती, परंतु, रक्कम रु.

३७,२८५/– एवढी रक्कमच जमा करण्यात आली व ११,७१५/– रुपयाची तफावत दिसली. कोरम नसताना खोटे रेकॉर्ड तयार करुन ११,७१५/– एवढ्या रकमेचा अपहार झाल्याचे दिसून आले. एकंदरीत संबंधित पतसंस्थेने ४,६७,८०६/– एवढे नियमबाह्य कर्ज वाटप केले आहे व ७,६३,०००/– एवढी रक्कम ही नियमबाह्य गुंतवणूक केली आहे व जागा विक्रीसाठी खोटे कागदपत्र तयार करुन त्यामध्ये ११,७१५/– रुपयांचा अपहार केला आहे. असा एकूण १२,४२,५२१/– रुपयांचा अपहार संचालक मंडळाद्वारे म्हणजे आरोपींद्वारे झालेला आहे. आरोपींनी विश्वासघात करुन फसवणूक करुन संसथेच्या निधीचा अपहार व गैरवापर केला आहे. त्याबाबत खुलासा करावा म्हणून दि.०२/०८/२००८ रोजी नोटीस देऊन तीन दिवसांची मुदत दिली व खुलासा मागविला व दि.१८/०८/२००८ रोजी खुलासा प्राप्त झाला, परंतु, तो असमाधानकारक असल्याने तो अमान्य करण्यात आला. त्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाकडे दि.१४/०१/२००८ रोजीचे परिपत्रकानुसार व सहकार आयुक्त व निबंध सहकारी संस्था यांचे दि.१०/०१/२००८ रोजीचे पत्रानुसार आरोपींविरुद्ध फिर्याद दाखल केली आहे. सदर फिर्यादला अनुसरुन आरोपीविरुध्द भुदरगड पोलिस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र.५३/२००९ असा नोंद झाला. गुन्हयाचा तपास यांचेकडे सोपविण्यात आला. तपासी अंमलदार यांनी संबंधीत साक्षीदारांचे बयान नोंदवुन घेतले, घटनास्थळाचा पंचनामा केला, मुद्देमाल जप्त केला व आरोपीविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७३ प्रमाणे दोषारोपपत्र सादर केले.

६. माझे पुर्वपिठासीन अधिकारी यांनी **नि.क्र.१२२** वर आरोपींवर भारतीय दंड विधान संहितेचे कलम ४०६, ४०८, ४२०, ४२६, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे अन्वये दोषारोप ठेवला. त्यानंतर दोषारोप पत्रामध्ये कलम ४२६ ऐवजी कलम ४२७ लावण्यात आले व इतर किरकोळ दुरूस्ती करुन दोषारोप **नि.क्र.२०८** वर नोंदविण्यात आला. त्यानंतर ज्यादाचा साक्षीदार तपासणेचा नाही, अशी पुरशिस अभियोग पक्षाने नि.क्र.२०९ अन्वये व आरोपींनी नि.क्र.२१० अन्वये दाखल केली.

७. त्यानंतर देखील दोषारोपामधील तारखेमध्ये किरकोळ स्वरुपाचा बदल केला. त्यानंतर सदर दोषारोप आरोपींना मातृभाषेत वाचुन व समजावुन सांगण्यात आला. आरोपींनी त्याच्यावरील आरोप नाकारुन खटल्याची संपरिक्षा घेण्याची मागणी केली. ज्यादाचे साक्षीदार तपासावयाचे नाही, अशी पुरशीस अभियोग पक्षाने नि.क्र.२०९ व आरोपींनी नि.क्र.२१० द्वारे दिली.

८. आरोपी क्र. १, २, ४, ५ व ६ हे मयत असून त्यांच्या विरुद्ध सदर खटला हा अबेट करण्यात आलेला आहे.

९. आरोपी क्र.३ व ७ ते ११ यांचेविरुद्ध आक्षेपार्ह पुरावा अभिलेखावर आल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ अन्वयेचे नि.क्र.१८८ ते १९३ वर निवेदन नोंदवण्यात आले.

१०. अभियोग पक्षाचे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. डी. ए. बनसोडे व आरोपी तर्फे विद्वान विधिज्ञ श्री. डी. डी. पाटील व श्री. के. व्ही. पाटील

यांचा युक्तीवाद ऐकला.

११. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकुन व अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केल्यानंतर माझे विवेचनाकरीता खालील मुद्दे उपस्थित झाले. त्या कामी कारणमिमांसेसह निष्कर्ष खालील प्रमाणे नोंदवले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | तुम्ही आरोपींनी दि.११/०५/१९९६ ते दि. ०४/०१/२००८ या कालावधीमध्ये श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था, शेणगाव, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर यांचे संचालक, चेअरमन अथवा कार्यकारी मंडळातील सदस्य या नात्याने संबंधित संस्थेची रक्कम रु.१२,४२,५२१/– ही विश्वासाने सोपविण्यात आलेली असताना त्या रकमेचा अपहार व गैरव्यवहार करुन ती रक्कम गैरमार्गाने वापरली अथवा बेकायदेशीररित्या तिची विल्हेवाट लावली व त्या अन्वये तुम्ही भारतीय दंड संहिताचे कलम ४०६ सहकलम ३४ खाली शिक्षापात्र अपराध केला, हे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय ? | **नकारार्थी** |
| २) | वर नमूद कालावधीत तुम्ही सर्व आरोपींनी एकमेकांशी संगणमत करुन चेअरमन, संचालक अथवा कार्यकारी मंडळाचे सदस्य असताना तुमच्याकडे संबंधित रक्कम तुमच्या हुकूमात असताना तुम्ही त्या रक्कमेचा फौजदारीपात्र न्यासभंग केला व त्या अन्वये तुम्ही भारतीय दंड संहिताचे कलम ४०८ सहकलम ३४ खाली शिक्षापात्र केला, हे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय ? | **नकारार्थी** |
| ३) | वर नमूद कालावधीत तुम्ही सर्व आरोपींनी एकमेकांशी संगणमत करुन चेअरमन, संचालक अथवा कार्यकारी मंडळाचे सदस्य असताना तुमच्याकडे वर नमूद संबंधित रक्कम तुमच्या हुकूमात असताना तुम्ही बेकायदेशीर पद्धतीने कर्ज वाटप करुन अथवा बेकायदेशीर पद्धतीने संस्थेची रक्कम गुंतवून तसेच बेकायदेशीर पद्धतीने मौ. शेणगाव येथील सि.स.नं. १७६ मधील मिळकत | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | विकून संस्थेची फसवणूक केली आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहिताचे कलम ४२० सहकलम ३४ खाली शिक्षापात्र केला, हे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय ? | |
| ४) | वर नमूद कालावधीत तुम्ही सर्व आरोपींनी एकमेकांशी संगणमत करुन चेअरमन, संचालक अथवा कार्यकारी मंडळाचे सदस्य असताना श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. शेणगाव या संस्थेचे ५० रुपयांपेक्षा जास्त रक्कमेचे नुकसान (आगळीक) केले आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहिताचे कलम ४२७ सह कलम ३४ खाली शिक्षापात्र केला, हे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय ? | **नकारार्थी** |
| ५) | वर नमूद कालावधीत तुम्ही सर्व आरोपींनी एकमेकांशी संगणमत करुन चेअरमन, संचालक अथवा कार्यकारी मंडळाचे सदस्य असताना मौ. शेणगाव सि.स.नं.१७६ मधील जमीन लिलावाद्वारे विक्री करणेकामी खोटी व बनावट कागदपत्रे तयार केली आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहिताचे कलम ४६८ सह कलम ३४ खाली शिक्षापात्र केला, हे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय ? | **नकारार्थी** |
| ६) | वर नमूद कालावधीत तुम्ही सर्व आरोपींनी एकमेकांशी संगणमत करुन चेअरमन, संचालक अथवा कार्यकारी मंडळाचे सदस्य असताना मौ. शेणगाव येथील सि.स.नं.१७६ मधील मिळकत लिलावाद्वारे विक्री करताना त्याची कागदपत्रे खोटी आहेत याची माहिती असून देखील खोट्या कागदपत्रांचा वापर जाणीवपूर्वक केला आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहिताचे कलम ४७१ सह कलम ३४ खाली शिक्षापात्र केला, हे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय ? | **नकारार्थी** |
| ७) | अंतिम आदेश काय ? | ***अंतिम आदेशाप्रमाणे*** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र.१ ते ६ करीता</u> –**

१२. संबंधित मुद्दे हे एकमेकांशी संलग्न असल्याने ते एकत्र चर्चिले आहेत. अभियोग पक्षाने हकीकत सिद्ध करण्यासाठी फिर्यादी श्रीपाल (सा. क्र.१) लेखापरिक्षक यांच्या साक्षीचा आधार घेतला त्यांनी त्यांचे साक्षीमध्ये संबंधित संस्थेचे लेखापरिक्षण दि.०१/०४/२००२ ते ३१/०३/२००३ या कालावधीसाठी केले व वर्दीजबाबात केलेल्या कथनांची पुनरावृत्ती केली व लेखापरीक्षणाचा अहवाल नि.क्र.१६५ हा बरोबर बनवल्याचे त्यांनी सांगितले व आरोपींनी बेकायदेशीररित्या कर्ज वाटप केले, संस्थेची फसवणूक केली व अपहार देखील केला, असे सांगितले. उलटतपासामध्ये त्यांनी पुढील बाबी मान्य केल्या जसे की, सर्व लेखापरीक्षणाची कागदपत्रे ही त्यांच्या कार्यालयात जमा केली होती, तसेच कार्यालयाची कागदपत्रे स्वतः जवळ ठेवता येत नाहीत, लेखापरीक्षणाचा अहवाल हा कार्यालयात जाऊन त्यांनी दाखल केला नाही. लेखापरीक्षणाचा अहवाल हा ३ प्रतीमध्ये असतो. त्याची एक प्रत कार्यालयात, दुसरी प्रत संस्थेला दिली जाते व तिसरी प्रत जिल्हा उपलेखापरीक्षक यांचेकडे दिली जाते. प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये दाखल केलेला लेखापरीक्षणाचा अहवाल नि.क्र.१६५ ची प्रत त्यांनी संबंधित तिनही कार्यालयाकडे मागितलेली नाही. जिल्हा सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी दि.१८/०८/२००७ रोजीचा आदेश (नि.क्र.१६२) पारित करून २००२ व २००३ (०१/०४/२००२ ते ३१/०३/२००३) या वर्षापूर्वीचे ३ वर्षाचे लेखापरीक्षण करण्याचे निर्देश त्यांना देण्यात आलेले होते. महाराष्ट्र सहकारी संस्था १९६० चे कलम ८३ नुसार चौकशीचा आदेश पारित केला जात असतो व कलम ८८

नुसार चौकशी झालेली नाही. लेखापरीक्षण अहवालामध्ये कर्ज मुदतीबाबत अथवा कर्जाच्या फेडीच्या मुदतीबाबत काहीही नमूद केलेले नाही. कर्जखाते उतारा दाखल केलेला नाही. एक सहकारी संस्था दुस-या सहकारी संस्थेमध्ये ठेवी ठेवते. संबंधित ठेवीच्या बाबतीत संचालकांनी अपहार केल्याची तक्रार त्यांच्याकडे कोणीही केलेली नाही, जागा विक्रीच्या ठरावावर आरोपी क्र.८ ची सही नाही. उलटतपासामध्ये असे देखील सुचविण्यात आले की, ०१/०४/२००२ ते ३१/०३/२००३ या कालावधीचे लेखापरीक्षण करण्याचा आदेश पारित झालेला नव्हता व परिक्षण न करता खोटा लेखापरिक्षण अहवाल दाखल केला, तसेच, ४९,०००/- एवढी रक्कम चुकून टाकली गेली आहे, परंतु, या बाबी साक्षीदाराने स्पष्टपणे नाकारल्या आहेत.

१३. अभियोग पक्षाचे हकीकतीनुसार ०१/०४/२००२ ते ३१/०३/२००३ या कालावधीचा श्री. महालक्ष्मी नागरी सहकारी संस्था मर्या., शेणगाव ता. भुदगरड लेखापरिक्षण अहवालाची प्रत जप्तही पंचनाम्याद्वारे करण्यात आली आहे. सदर बाब सिद्ध करणेकामी जप्ती पंच दिनकर (सा.क्र.२) यांच्या साक्षीचा आधार घेतला, परंतु, सदरील साक्षीदाराने अभियोग पक्षाचे हकीकतीस दुजोरा दिला नाही.

१४. अभियोग पक्षाचे हकीकतीनुसार काही कर्ज रोखे, किर्द व प्रोसिडींग बुक देखील जप्ती पंचनाम्याद्वारे जप्त करण्यात आले होते, सदरील बाब सिद्ध करणेकामी शैलेश (सा.क्र.३) व हिंदुराव (सा.क्र.६) यांच्या साक्षीचा आधार घेतला, परंतु,

सदरील दोन्हीं साक्षीदारांनी अभियोग पक्षाचे हकीकतीस दुजोरा दिला नाही.

१५. अभियोग पक्षाचे हकीकतीनुसार शशिकांत (सा.क्र.४) हे संस्थेचे कर्जदार होते व त्यांनी दि.१५/०६/१९९८ रोजी ९०,०००/- रुपयांचे कर्ज मुदत तारण स्वरुपात घेतले होते व त्यांनी कर्जाची काही रक्कम भरून ३८ हजार रुपये कर्जाचे भरणे बाकी होते. संबंधित साक्षीदाराने कर्ज घेतले होते व कर्ज फेडले एवढीच बाब सांगितली व अन्य कोणत्याही प्रकारे अभियोग पक्षाचे हकीकतीला दुजोरा दिला नाही.

१६. अभियोग पक्षाचे हकीकतीनुसार संस्थेने सि.स. नं.१७६ मधील १५२४ चौ.मी. क्षेत्र हे खोटे कागदपत्र तयार करुन संस्थेची फसवणूक करुन आरोपींनी काही रकमेचा अपहार केला व जो लिलाव झाला तो बेकायदेशीररित्या झाला होता. लिलावामध्ये विजय (सा.क्र.५) यांनी संबंधित क्षेत्र खरेदीकामी ५७,०००/- दिले, परंतु ३७,२८५/- एवढ्या रकमेला विजय (सा. क्र.५) यांची बोली आली व गोपाळ (सा.क्र.८) यांची बोली ४९,०००/- रुपयांची बोली आली असून देखील कमी किमतीला म्हणजे ३७,२८५/- या रकमेला संबंधित क्षेत्र संबंधित संस्थेने विजय यांना विकले, परंतु विजय यांनी त्यांच्या साक्षीमध्ये ४०,०००/- ची बोली लावली व कायदेशीररित्या जागा विकत घेतली असे त्यानी सांगितले. या पलीकडे त्यांनी अभियोग पक्षाच्या हकीकतीला दुजोरा दिला नाही.

१७. अभियोग पक्षाचे हकीकतीनुसार गोपाळ (सा.क्र.८) हे सि.स. नं. १७६

मधील जागा विक्री करण्याच्या लिलावावेळी तिथे हजर नव्हते व तरी देखील त्यांच्या नावे ४९,०००/– रुपयांची बोली त्यांनी लावली असे संस्थेने दाखविले व कमी रकमेला म्हणजे ३७,२८५/– एवढ्या रकमेला विजय (सा.क्र.५) यांना संस्थेने क्षेत्र विकले. थोडक्यात, लिलावावेळी खोटी कागदपत्रे आरोपींनी तयार केली. गोपाळ (सा.क्र.८) यांनी घटनेबद्दल त्यांना काहीही माहिती नाही असे सांगितले व अभियोग पक्षाचे हकीकतीला कोणत्याही प्रकारे दुजोरा दिला नाही.

१८.		अभियोग पक्षाचे हकीकतीनुसार सुनील (सा.क्र.९) हे देखील कर्जदार होते व त्यांनी देखील दि.३१/०३/१९९९ रोजी ३७,०००/–रुपयांचे मुदत तारण कर्ज घेतले होते व सदरील कर्ज त्यांनी वरचेवर भरले आहे व आरोपींनी नियमबाह्य कर्ज वाटप करुन संस्थेची फसवणूक करुन अपहार करुन विजय भोसले यांना बेकायदेशीर लिलावाद्वारे जमीन विकल्याचे त्यांना समजले, परंतु, सदरील साक्षीदाराने अभियोग पक्षाचे हकीकतीला उपयोगी पडेल अशी कोणतीही बाब सांगितली नाही.

१९.		दत्तात्रय (सा.क्र.१०) हे वरिष्ठ पोलीस निरीक्षक असून त्यांनी गुन्ह्याचा तपास काही अंशी केला. सदरील साक्षीदाराने एकूण २० रजिस्टर्स (article A to J) ही त्यांनी पंचांसमक्ष म्हणजे जप्ती पंच शैलेश (सा.क्र.३) याच्या उपस्थितीमध्ये जप्त केले व त्यानुसार जप्ती पंचनामा (नि.क्र.१४८) तयार केला, असे सांगितले. तसेच कर्जरोखा, प्रोसिडींग बुक याबाबतची कागदपत्रे देखील जप्त केली व त्याचे जप्ती पंचनामा १५२ हा पंचांसमक्ष तयार केल्याचे सांगितले. उलटतपासामध्ये त्यांनी असे

मान्य केले की, सहकारी संस्थेचे निबंधक यांच्याकडून संबंधित कागदपत्र जप्त करण्यापूर्वी त्यांची परवानगी त्यांनी घेतलेली नव्हती. तसेच, आरोपी क्र.८ हे कोणत्या कर्जप्रकारणात जबाबदार आहेत हे त्यांना सांगता येणार नाही व ते कोणत्या कालावधीमध्ये संचालक होते हे देखील त्यांना सांगता येत नाही.

२०. अभियोग पक्षाचे हकीकतीनुसार संबंधित गुन्ह्याचा तपास हा राजेंद्रकुमार (सा.क्र.११) यांनी केला. संबंधित साक्षीदाराने त्याचे साक्षीमध्ये असे सांगितले की, त्यांना तपासाअंती आरोपींनी गुन्हा केल्याचे दिसून आल्याने दोषारोप पत्र दाखल केले. उलटतपासात त्यांनी असे मान्य केले की, जप्त केलेली कागदपत्रे ही हस्ताक्षर तज्ञांकडे तपासणीसाठी त्यांनी पाठविली नाहीत. त्यानंतर त्यांना पुढे असे देखील विचारण्यात आले की, खोटा दोषारोप पत्र आरोपींविरुद्ध दाखल करण्यात आले, परंतु, सदरील बाब ही साक्षीदाराने नाकारली.

२१. आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी असा युक्तिवाद केला की, फिर्यादी श्रीपाल साक्षीदार क्र.१ यांनी जो लेखापरिक्षण अहवाल नि.क्र.१६५ ला दाखल केला आहे, तो पुराव्यात वाचता येणार नाही. भारतीय पुरावा कायदा १८७२ चे कलम ६४ नुसार मुळ कागदपत्र दाखल करणे अपेक्षित आहे. दुयय्म पुरावा परस्पर दाखल केला असल्यास तो भारतीय पुरावा कायदा कलम ६५ ची पुर्तता करत नसल्याने ते कागदपत्र पुराव्यात वाचता येणार नाही. आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी यांनी असा युक्तिवाद केला की, मुळ फिर्यादीने नि.क्र.१६५, १६२ ही कागदपत्रे दाखल केली असली तरी

ती पुराव्यात वाचता येणार नाही व त्यासाठी पुरवणी दोषारोप पत्राद्वारे दाखल करणे जरुरीचे आहे. सदरकामी त्यांनी खालील न्यायनिर्णयावर या न्यायालयचे लक्ष वेधले.

**भाग्यश्री प्रकाश वासनकर वि. महाराष्ट्र सरकार २०२१ ऑल.एम.आर. (क्रिमिनल) ३०३०** सदर न्यायनिर्णयामध्ये ज्यादा कागदपत्र देण्याची परवानगी फौजदारी खटल्यामध्ये कधी देता येऊ शकते, या गोष्टीचा ऊहापोह आ. उच्च न्यायालय मुंबई यांनी केला. सदर न्यायनिर्णयामध्ये आ. जिल्हा न्यायाधीश यांनी प्रकरण पुराव्याला लागले तरी साक्षीदार फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४२ अथवा कलम २९४ च्या तरतुदीअन्वये काही कागदपत्र सादर करायची असल्यास तो ते करु शकतो, असा आदेश पारित केला. सदर आदेश सेट असाईड करताना आ. उच्च न्यायालय मुंबई यांनी असे म्हणले आहे की, फौजदारी प्रक्रिया संहितामध्ये साक्षीदाराने ज्यादाची कागदपत्रे सादर करण्याची कोणतीही तरतुद नाही व फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४२ अथवा २९४ च्या तरतुदींचा विचार करुन देखील तशी परवानगी कागदपत्र दाखल करण्यास देता येणार नाही व ज्यादाची कागदपत्र दाखल करावयाची झाल्यास पुरवणी दोषारोपाद्वारे फौजदारी प्रक्रिया कलम १७३(८) चे प्रक्रियेचा अवलंब केला पाहिजे.

२२. आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी असा युक्तिवाद केला की, फिर्यादी श्रीपाल हे लेखापरिक्षक असून त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये असे स्पष्टपणे मान्य केले आहे की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ नुसार

चैकशीचा आदेश पारित केला जातो व कलम ८८ नुसार चौकशी केली जाते, परंतु, निबंधकांनी तशा प्रकारचे आदेश पारित केलेले नाहीत. सदरकामी त्यांनी खालील न्यायनिर्णयावर या न्यायालयचे लक्ष वेधले.

अ)**भास्कर शामराव भोसले वि. महाराष्ट्र सरकार २०१३ ऑल.एम.आर. क्रिमिमल २७१२** आदरणीय उच्च न्यायालय, मुंबई यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४८२ द्वारे दाखल केलेली याचिका मंजूर करुन असे म्हणले की, जेव्हा संस्थेच्या संचालकांनी अथवा कर्मचा–यांनी योग्य ती जामीनाची कागदपत्रे न घेता मोठ्या प्रमाणात जरी कर्ज वाटप केले असले तरी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ नुसार निबंधकांनी चौकशी करुन त्यांना काहीही निष्पन्न झाले नाही, तर अशा वेळेस कलम ४२०, ४०६ ,४०८ बाबत जो प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यात आला आहे व त्या अनुषंगाने पुढील प्रक्रिया रद्दबादल करणे (quash) योग्य वाटत आहे.

ब) **शिव नारायण लक्ष्मी नारायण जोशी व इतर वि. महाराष्ट्र सरकार ए.आय.आर. १९८० एस.सी. ४३९** सदर न्यायनिर्णयामध्ये आदरणीय सर्वोच्च न्यायालय यांनी भारतीय दंड विधान संहिता कलम १२० (अ) व (ब) च्या तरतुदी विचारात घेउन असे म्हणले की, कट कारस्थान हे नेहमी गुप्त पद्धतीने केले जाते व त्याबद्दलचा प्रत्यक्षदर्शी पुरावा येणे खूप अवघड असते व वेगवेगळ्या बाबींचा संदर्भ विचारात घेऊन न्यायालयाने तर्क काढून कट कारस्थान सिद्ध केले गेले होते का व तर्काद्वारे ते सिद्ध

होत आहे का, याचा विचार करणे जरुरीचे आहे.

क) <u>आनंद रामचंद्र चौगुले व इतर वि. सिदारी लक्ष्मण चौगुले ए.आय.आर. (एस.सी.) पान क्र.३८७१</u> सदर न्यायनिर्णयामध्ये आदरणीय सर्वोच्च न्यायालय यांनी असे म्हटले की, फौजदारी खटल्यामध्ये आरोपीला त्याचा बचाव संशयापलीकडे सिद्ध करणे अपेक्षित नाही व या उलट अभियोग पक्षाने केलेले आरोप संशयापलीकडे सिद्ध करण्याची त्यांची जबाबदारी आहे व आरोपीच्या बचावातील कमकुवतपणाचा आधार अभियोग पक्ष घेऊ शकत नाही. आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी पुढे असा युक्तिवाद केला की, अभियोग पक्षाने श्री.पाठक यांना साक्षीदार म्हणून तपासले नाही व त्यामुळे अभियोग पक्षाने महत्वाचे साक्षीदार तपासले नाही व त्यामुळे महत्वाची बाब अभियोग पक्ष लपवत आहे व श्री. पाठक यांच्या लेखापरिक्षणामध्ये कोणतीही त्रुटी दिसून आली नाही. त्यामुळे या सर्व कारणास्तव आरोपींना निर्दोष मुक्त करावे.

२३. अभियोग पक्षातर्फे विद्वान विधिज्ञ यांनी असा युक्तिवाद केला की, अभियोग पक्षाने केलेले आरोप हे संशयापलीकडे सिद्ध केलेले आहेत. फिर्यादी श्रीपाल (सा.क्र.१) यांची साक्ष विश्वासार्ह आहे, त्यांनी त्यांचे साक्षीमध्ये आरोपींनी बेकायदेशीररित्या कर्ज वाटप केले व एका संचालकाने त्याच्या पत्नीला देखील कर्ज दिले, हे आरोप देखील संशयापलीकडे सिद्ध केले आहेत. आरोपींनी कर्ज वाटप करताना योग्य ती काळजी घेतलेली नाही व जामीनमदबा न घेता कर्ज वाटप केले व ते सहकार कायद्याच्या तरतुदीला अधिन राहून केलेले नाही त्यामुळे त्यांनी कायद्याचे

तरतुदीचे उल्लंघन केले आहे. संस्थेमध्ये ठेवलेल्या ठेवी अथवा अन्य लोकांनी केलेली गुंतवणूक कार्यकारी मंडळाकडे विश्वासाने दिली असते व कायद्याप्रमाणे त्यांनी रकमेचे वितरण त्यांनी केलेले नाही. त्यामुळे भा.दं.वि.कलम ४०६ नुसार मिळकीतीची विल्हेवाट योग्यरित्या न लावल्याने अपराध फौजदारी न्यासभंग होत आहे. तसेच संस्थेचे नुकसान झाल्यामुळे भा.दं.वि.कलम ४२५ चा अपराध झाल्याचे संशयापलीकडे सिद्ध केले आहे व नुकसान हे ५० रुपयांपेक्षा जास्त झाल्याने कलम ४२७ बाबत आरोपीला दोषी ठरवून जास्तीत जास्त शिक्षा द्यावी.

२४. अभियोग पक्षाद्वारे विद्वान विधिज्ञ यांनी पुढे असा युक्तिवाद केला की, कर्ज बेकायदेशीररितया वाटल्यामुळे व संबधित जमिनीचा लिलाव बेकायदेशीररित्या केल्यामुळे व कमी रकमेला क्षेत्र विजय भोसले यांना विकल्यामुळे आरोपींनी संस्थेची ठकवणूक देखील केली आहे व भा.दं.वि.कलम ४२० बाबतीतला आरोप देखील संशयापलीकडे सिद्ध होत आहे तसेच लिलावाद्वारे खोटी कागदपत्रे केली आहेत. त्यामुळे आरोपीला दोषी ठरवून जास्तीत जास्त शिक्षा भा.दं.वि.कलम ४६८ बाबत देण्यात यावी.

२५. अभियोग पक्षाद्वारे विद्वान विधिज्ञ यांनी पुढे असा युक्तिवाद केला की, लेखापरिक्षक श्री.पाठक यांना देखील त्यांनी केलेल्या लेखापरिक्षणामध्ये त्रुटी आढळल्या व त्याचा लेखापरिक्षण अहवाल देखील सादर केला आहे व जरी श्री.पाठक यांना साक्षीदार म्हणून तपासले नसले तरी फिर्यादी श्रीपाल (सा.क्र.१) हे देखील

लेखापरिक्षक असल्याने त्यांच्या लेखापरिक्षणाच्या आधारे संशयापलीकडे गुन्हा सिद्ध होत असल्याने श्री.पाठक यांना साक्षीदर म्हणून न तपासल्याने अभियोग पक्षाच्या हकीकतीला ती बाब घातक ठरत नाही. त्यामुळे महत्वाचा साक्षीदार तपासला नाही, असा जो युक्तिवाद बचाव पक्षातर्फे केला आहे, त्यामध्ये तथ्य नाही.

२६. अभियोग पक्षाद्वारे विद्वान विधिज्ञ यांनी पुढे असा देखील युक्तिवाद केला की, जरी काही कागदपत्रे ही दोषारोप पत्रामध्ये नसली तरी पुराव्यावेळी काही कागदपत्रे जर दाखल केली असली तरी ती कागदपत्रे विचारात घेतली जाऊ शकतात. सदर युक्तिवादाच्या अनुषंगाने त्यांनी **समीर संधीर वि. केंद्रीय अन्वेषण विभाग (सी.बी.आय.) २०२५ लाईव्ह लॉ (एस.सी.) ६२७** सदर न्यायनिर्णयामध्ये आदरणीय सर्वोच्च न्यायालय यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७३(५) (८) व कलम २०७ च्या तरतुदी विचारात घेऊन असे म्हटले की, जरी सर्वसाधारणपणे सर्व कागदपत्रे ही दोषारोप पात्रासोबत दाखल करणे अपेक्षित असले तरी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७३(५) मध्ये जो शब्द 'shall' म्हणून वापरला आहे तो निर्देश देणारा (directory) आहे व द्यायलाच पाहिजे (mandatory) कागदपत्र दाखल व्हायलाच पाहिजे, याचा तसा अर्थ लावता येणार नाही व त्यामुळे नंतर देखील कागदपत्रे जरी अभियोग पक्षाने दाखल केली असली तरी ती विचारात घेतली जाऊ शकतात व ते खटला चालविणा-या न्यायालयाने ते कागदपत्र दाखल करण्यास परवानगी दिली, ती योग्यच आहे. अभियोग पक्षातर्फे विद्वान विधिज्ञ यांनी खालील

न्यायनिार्यावर या न्यायालयाचे लक्ष वेधले.

अ. <u>जयकृष्णदास मनोहरदास व इतर वि. महाराष्ट्र सरकार, १९६० ए.आय.आर. ८३३</u> सदर न्यायनिर्णयामध्ये आदरणीय उच्च न्यायालय, मुंबई यांनी भा.दं.वि.क.४०९ च्या तरतुदी विचारात घेऊन असे म्हटले की, आरोपीने फौजदारी न्यासभंग केल्याबाबत मालमत्तेचा व प्रामाणिक व्यवहार जर त्याने अप्रामाणिक भावनेने (dishonest intention) केला आहे या बाबतीत त्याने खुलासा दरवेळेस दिला पाहिजे असे नाही, परंतु, ज्यावेळी त्याचा खुलासा तो देऊ शकत नसेल अथवा दिलेला खुलासा हा खोटा असेल त्यावेळी असा तर्क लावला जाऊ शकतो की, त्याने अप्रामाणिक भावनेने ते कृत्य केले आहे

ब. <u>कृष्णकुमार वि. भारत सरकार, १९५९ ए.आय.आर. १३९०</u> सदर न्यायनिर्णयामध्ये आदरणीय सर्वोच्च न्यायालय आरोपीने जर मालमत्तेचा अप्रामाणिक अहवाल (dishonest misappropriation of property) केला असल्याचे आरोप असतील तर अशा वेळी आरोपीने दिलेले स्पष्टीकरण जे जर खोटे आहे, असे दिसून येत असेल तर सर्व संभाव्य शक्यता अभियोग पक्षाने सिद्ध करण्याची गरज नाही व दिलेले स्पष्टीकरण हे खोटे आहे एवढे जरी अभियोग पक्षाने सिद्ध केले तेवढे पुरेसे आहे.

क. <u>हिमाचल प्रदेश सरकार वि. करणवीर ए.आय.आर. २००६ एस.सी. २२११</u> सदर न्यायनिर्णयामध्ये आदरणीय सर्वोच्च न्यायालय यांनी भा.दं.वि.कलम

४०५, ४०९ च्या तरतुदी विचारात घेतल्या व पुढे अस म्हणले की, सुरूवातीला ज्या बाबी अपहाराच्या बाबतीत अथवा फौजदारी न्यासभांगाच्या बाबतीत दाखवून देणे अपेक्षित आहे. त्या बाबी जर अभियोग पक्षाने जर सिद्ध केल्या असतील तर व एखादी मिळकत एखाद्या व्यक्तीकडे विश्वासाने सोपविली (entrustment) आहे असे हे सिद्ध केले व त्या परिस्थितीमध्ये आरोपीने कोणतेही स्पष्टीकरण दिले नाही तर अभियोग पक्षाचे कोणतेही नुकसान होणार नाही व ते स्पष्टीकरण देऊन फौजदारी न्यासभंग कसा झाला नाही, हे सिद्ध करण्याची जबाबदारी आरोपीची राहिल.

२७. आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी जो आक्षेप घेतला की, फिर्यादी यांनी दाखल केलेला लेखापरिक्षण अहवाल नि.क्र.१६५ हा वाचता येणार नाही व दुय्यम पुरावा म्हणून दाखल करण्याची परवानगी देता येणार नाही. त्या बाबतीत यान्यायालयाचे मत आहे की, मुळ कागदपत्र मिळून येत नसल्याने त्याची प्रत दाखल करण्याची परवानगी माझे विद्वान पुर्वाधिकारी यांनी या प्रकरणामध्ये दिली आहे. तसेच, **समीर संधीर** या न्यायनिर्णयातील प्रमाणाचा उपयोग अभियोग पक्षाला होत आहे. त्यामुळे जरी पुरवणी दोषारोप पत्राद्वारे काही कागदपत्रे फिर्यादी यांनी सादर केली नसली तरी देखील संबंधित कागदपत्रे ही विचारात घेतली जाऊ शकतात व त्यामुळे आरोपीतर्फे जो आक्षेप घेतला गेला की, ज्यादाची कागदपत्रे पुराव्यात वाचता येणार नाहीत या युक्तिवादामध्ये तथ्य नाही. **भाग्यश्री वासणकर** या न्यायनिर्णयातील प्रमाणाचा आधार घेऊन या न्यायालयाचे असे मत आहे की, त्या न्यायनिर्णयाचे प्रमाण आरोपींना

उपयोगी नाही. जरी जप्ती पंचांनी अभियोग पक्षाचे हकीकतीला दुजोरा दिला नसला तरी अभियोग पक्षाने दत्तात्रय (सा.क्र.१०) व राजेंद्रकुमार (सा.क्र.११) यांच्या साक्षीमार्फत जप्ती पंचनामा नि.क्र.१८५ व १४८ हे सिद्ध केले आहेत, असे म्हणता येईल. त्यामुळे केवळ जप्ती पंच दिनकर (सा.क्र.२) व हिंदुराव (सा.क्र.६) यांनी अभियोग पक्षाचे हकीकतीला दुजोरा दिला नाही याचा अर्थ जप्ती पंचनामा सिद्ध केला नाही असे म्हणता येणार नाही. जरी जप्ती पंचनामा हा सिद्ध केला असला तरी अभियोग पक्षाने जे मुख्य आरोप केले आहेत आरोपीने बेकायदेशीररित्या कर्ज वाटप करुन ठकवणूक (cheating) व फौजदारी न्यासभंग केला, या बाबी संशयापलीकउे सिद्ध केल्या आहेत का नाही हे विचारात घेणे आवश्यक आहे. या अनुषंगाने भा.दं.वि.कलम ४१५ व ४०५ च्या व्याख्या विचारात घेणे जरुरीचे आहे.

**Section 415 (cheating) –** Whoever, by deceiving any person, fraudulently or dishonestly induces the person so deceive to deliver any property to any person, or to consent that any person shall retain any property, or intentionally induces the person so deceived to do or omit to do any thing which he would not do or omit if where not so deceived and which act or omission causes or likely to cause damage or harm to that person in body, mind, reputation or property, is said to "cheat"

**Section 405 (criminal breach of trust) –**

whoever, being in any manner entrusted with property, or with any dominion over property, dishonestly misappropriate or converts to his own use that property, or dishonestly uses or disposes that property in violation any direction of law prescribing the mode in which such trust is to be discharged, or any legal contract, express or implied, or which is made touching the discharge of such trust or willfully suffers any other person so to do, commits "criminal breach of trust"

२८. आदरणीय सर्वोच्च न्यायालय यांनी **अर्षेद नियाज खान वि. झारखंड सरकार २०२५ लाईव्ह लॉ (एस.सी.) ९५०** या न्यायनिर्णयामध्ये भा.दं.वि. ४०५, ४०६ व ४२० च्या तरतुदी विचारात घेतल्या. आदरणीय सर्वोच्च न्यायालय यांनी भा.दं.वि. कलम ४२० ठकवणूकची तरतुद विचारात घेतली व पुढे असे म्हणले की, It is manifest that in the definition of "cheating" there are two separate classes of acts which the person deceived may be induced to do. In the first class of acts, he may be induced fraudulently or dishonestly to deliver property to any person. The second class of act is the doing or committing to do any thing which the person deceived would not do or omit to do if he were not so deceived. In the first class of the case, the inducement may be fraudulent or dishonest. In the second class of act, the inducing must be intentional, but, need not be

fraudulent or dishonest. The intention is the gist of the offence. To hold a person guilty of cheating it is necessary to show that he had fraudulent or dishonest intention at the time of making promise. The failure to subsequently to keep a promise, one cannot be presumed that he had culpable intention, to break the promise from the beginning. The culpable intention has to be proved from the inception when the promise was made and it cannot be presumed, rather, it has to be proved by cogent evidence. To prove the offence punishable under section 405 of I.P.C. it has to be proved that person having possession of the property receives it legally, but, illegally retains it or converts to his own use against the terms of contract. When the question will arise that such retention was with dishonest intention nor not and whether such retention was having criminal breach of trust or only a civil liability will depend upon fact of each case. It is trite law that every act of breach of trust may not result in penal offence unless there is a evidence of manipulating of fraudulent misappropriation of property. There is a distinction between criminal breach of trust and cheating. For “cheating” criminal intention is necessary at the time of making false and misleading representation i.e. since inception. In criminal breach of trust, mere proof of entrustment is sufficient but it has to be proved

that, the offender was lawfully entrusted with property and he dishonestly misappropriated it. Whereas in case of cheating it has to be proved that offender fraudulently or dishonestly induced a person by deceiving him to deliver a property in such circumstances both offences cannot co–exist simultaneously on similar set of facts as they are antithetical to each other.

२९. सोप्या भाषेत सांगावयाचे झाले तर ठकवणूक करताना एखाद्या व्यक्तीची ठकवणूक झाली आहे हे नुसते सिद्ध होऊन चालणार नाही तर ठकवणूक करताना ज्या व्यक्तीने वचन दिले आहे. त्या व्यक्तीने अप्रामाणिकपणे (dishonestly) दुस–या व्यक्तीला गैरन्यास अथवा गैरहानी करण्याच्या हेतूने ते वचन त्यावेळी दिले होते व दुसरा महत्वाचा घटक सिद्ध होणे अपेक्षित आहे की, वचन देणा–या व्यक्तीने कपटीपणाने (fraudulently) म्हणजे एखाद्या व्यक्तीला लुबाडण्याच्या हेतूने ते वचन दिले होते, या बाबी सिद्ध होणे अपेक्षित आहे. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास संचालक या नात्याने संबंधित पतसंस्था ही जाणीवपूर्वक आरोपींनी नुकसानीत घालायची या अप्रामाणिक (dishonestly) हेतूने अथवा कपटीपणाने (fraudulently) कर्जवाटप अनियमितपणे केले व त्या हेतुसाठीच त्यांनी कर्ज अनियमितपणे वाटले. **अर्षद नियाज खान** या न्यायनिर्णयामध्ये सांगितल्याप्रमाणे एखाद्या व्यवहाराबाबतीत असे गृहित धरून चालता येणार नाही की, वचन देणा–या व्यक्तीने अप्रामाणिक अथवा कपटीपणानेच वचन दिले होते. या उलट असे

संशयापलकडे सिद्ध होणे अपेक्षित आहे की, वचन देणा–या व्यक्तीने तसे अप्रामाणिक अथवा कपटीपणाने वचन दिले आहे.

३०. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास आरोपींना संचालक अथवा संस्थेचे कर्मचारी या नात्याने त्यांनी जी विविध कर्जे वेळोवेळी वाटप केली ते संस्था नुकसानीत जाण्याच्या हेतूनेच वाटप केली, असे सिद्ध होणे अपेक्षित आहे, परंतु, कोणताही संस्था चालक त्यांची संस्था ही नुकसानीत जावी या हेतूने जाणीवपूर्वक काम करेल, असे म्हणता येणार नाही. त्यामुळे ठकवणूक करण्याच्या हेतूनेच कर्ज वाटप केली, असे म्हणणे उचित होणार नाही.

३१. भा.दं.वि.कलम ४०५ नुसार फौजदारी न्यासभंगाचा अपराध सिद्ध होणेकामी देखील अभियोग पक्षाने केवळ हे सिद्ध करणे अपेक्षित नाही की, जी व्यक्ती स्वतःकडे असणारी मालमत्ता अथवा तिच्यावर विश्वासाने सोपविलेल्या मालमत्तेचा अपहार हा स्वतःच्या फायद्याकरीता करते अथवा त्याची विल्हेवाट कायद्याला अपेक्षित पद्धतीने न लावता (violation of any direction of law prescribing the mode in which is trust is to be discharged.) करते. तर अभियोग पक्षाने हे देखील संशयापलीकडे सिद्ध करणे अपेक्षित आहे की, अपहार हा अप्रामाणिकपणे (dishonest intention) या हेतूने करणे जरुरीचे आहे. अभियोगपक्षाची अशी केस नाही की, आरोपींनी अपहाराचे पैसे स्वतःच्या लाभासाठी वापरले. (converts to his own use) जरी असे क्षणापुरते ग्राह्य मानले की,

संस्थाचालकाने त्याच्या नातेवाईकांना कर्ज दिले अथवा कर्ज देताना योग्य ती हमी घेतली नाही तरी त्या अनियमितपणाबद्दल महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ नुसार कारवाई केली जाते व फिर्यादी श्रीपाल (सा.क्र.१) यांनी त्यांच्या उलटतपासात मान्य केले की, त्या प्रकारची कारवाई संबंधित निबंधकांनी केलेली नाही. या ही पलीकडे केवळ अनियमितता दाखवून म्हणजे सहकार कायद्यातील तरतुदीचे पालन न करता बेकायदेशीररित्या कर्ज वाटले आहे, एवढे सिद्ध करणे पुरेसे नाही. अभियोग पक्षाने आरोपींनी केलेले कृत्य म्हणजे सहकार कायद्यातील संबंधित तरतुदींचे न केलेले पालन हे अप्रामाणिक हेतूने (dishonestly) केले आहे. ते देखील संशयापलीकडे सिद्ध करणे जरुरीचे आहे, याबद्दल या न्यायालयाच्या मनात शंका नाही. या आधी नमूद केल्याप्रमाणे कोणताही संस्था चालक हा त्याची स्वतःची संस्था नुकसानीत जावी यासाठी जाणीपूर्वक अप्रामाणिक वागेल असे वाटत नाही. त्यामुळे भा.दं.वि.कलम ४०५ मधील अपराध हा संशयापलीकडे सिद्ध करण्यामध्ये अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे, असे या न्यायालयाचे मत आहे. त्यामुळे भा.दं.वि.कलम ४०६ व ४०८ बाबतीत आरोपींना दोषी ठरविता येणार नाही.

३२.	**<u>अर्षद नियाज खान</u>** या न्यायनिर्णयामध्ये सांगितल्याप्रमाणे एकाच वस्तुस्थितीवर दोन अपराध विशेषतः भा.दं.वि.कलम ४०६ व ४२० घडू शकत नाही. त्यामुळे देखील संबंधित अपराध विशेषतः भा.दं.वि.कलम ४०६ चा अपराध हा संशयापलीकडे अभियोग पक्षाने सिद्ध केला आहे असे म्हणणे उचित होणार नाही.

३३. अभियोग पक्षाचे हकीकतीनुसार आरोपींनी बेकायदेशीररित्या कर्ज वाटल्यामुळे संस्थेचे नुकसान झाले व त्यामुळे आरोपींनी भा.दं.वि.कलम ४२७ अन्वये आगळीक हा अपराध केला. सदर कलमाचे अवलोकन केल असता असे दिसून येते की, जो कोणी एखाद्या व्यक्तीला गैरहानी करुन अथवा तिला नुकसान पोहोचविण्याच्या उद्देशाने अथवा ती व्यक्ती करत असलेल्या कृत्यामुळे एखाद्याची गैरहानी अथवानुकसान होण्याची जाणीव असताना जो कोणी मालमत्तेचा नाश घडवुन आणेल अथवा त्या मालमत्तेची उपयुक्तता नष्ट करेल अथवा कमी करेल अथवा त्यावर क्षतीकारक परिणाम होईल असा कोणताही बदल त्यामध्ये घडेल ती व्यक्ती आगळीक (mischief) करेल असे समजले जाईल.

३४. अभियोग पक्षाने असे आरोप केले आहेत की, आरोपी संस्था चालक या नात्याने बेकायदेशीररित्या कर्ज वाटप केले व योग्य ती कागदपत्रे जामीनाबाबत घेतली नाहीत तसेच, संस्थेच्या ठेवी अन्य पतसंस्थेमध्ये गुंतवल्या अथवा लिलावामध्ये अधिक बोली व्यक्तीने लावून देखील कमी किंमतीला लिलाव करुन संस्थेचे नुकसान केले. याबाबतीत अभियोग पक्षाचा जो पुरावा आला आहे, त्याबाबत या न्यायालयाचे असे मत आहे की, फिर्यादी श्रीपाल (सा.क्र.१) यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये असे मान्य केले आहे की, एक सहकारी संस्था दुस–या सहकारी संस्थेमध्ये ठेवी ठेवतात व सहकार कायद्यातील तरतुदीनुसार संस्था या दुस–या संस्थेमध्ये ठेवी ठेवत असतात संबंधित ठेवी बाबतचा अपहार झाल्याची तक्रार त्यांच्याकडे कोणीही केली नाही.

यावरून श्री महालक्ष्मी सहकारी पतसंस्था मर्या. शेणगाव यांनी अन्य पतसंस्थेमध्ये ठेवी ठेवलया म्हणून संस्थेचे नुकसान झाले असे म्हणता येणार नाही. तसेच जरी कर्जवाटप हे अनियमितपणे झाले असले तरी ते संस्थेचे नुकसान करण्याच्या अप्रामाणिक हेतूने ते केले गेले, असे म्हणता येणार नाही. कारण कोणतीही सहकारी संस्था कर्ज वाटप करत असते व तो त्यांचा व्यवसायाचा भाग आहे. या ही पलीकडे अभियोग पक्षाचे साक्षीदार शशिकांत (सा.क्र.४) याने असे मान्य केले की, त्यांनी कर्ज घेतले होते व ते कर्ज फेडले आहे व अनियमितपणे ज्यांना कर्ज वाटले आहे त्यावेळी संस्था चालकांनी संस्था नुकसनीत जावी अथवा संस्थेची उपयुक्तता नष्ट व्हावी अथवा संस्थेची बाजारातील पत कमी व्हावी व तिचे नुकसान व्हावे या अप्रामाणिक हेतूने कर्ज वाटप केले आहे, असे वाटत नाही अथवा आरोपींनी कर्ज वाटप करताना सदर बाबीच आरोपींना जाणीव होती असे म्हणणे उचित होणार नाही. त्यामुळे भा.दं.वि.कलम ४२७ चा अपराध हा संशयापलीकडे सिद्ध होत नाही, असे या न्यायालयाचे स्पष्ट मत आहे.

३५. अभियोग पक्षाचे हकीकतीनुसार आरोपींनी मौ.शेणगाव येथील सि.स.नं.१७६ मधील क्षेत्र विकताना खोटी कागदपत्रे तयार केली व गोपाळ (सा.क्र.८) व्यक्तीने संबंधित क्षेत्र खरेदी करण्यासाठी जास्त बोली ४९,०००/- रकमेला केली होती तरी देखील विजय भोसले (सा.क्र.५) यांना ३७,२८५/- या रकमेला क्षेत्र विकले व त्या अन्वये संस्थेची ठकवणूक केली. त्याअन्वये भा.दं.वि.कलम ४६८ अन्वये शिक्षापात्र अपराध केला व तसेच, खोटे कागदपत्र आहेत याची माहिती असून

देखील त्याचा वापर हा अस्सल कागदपत्र (genuine documents) असल्यासारखा केला व त्या अन्वये भा.दं.वि.कलम ४७१ अन्व्ये अपराध केला. प्रस्तुतचे आरोप सिद्ध करणेकामी अभियोग पक्षाने लेखापरिक्षक श्रीपाल (सा.क्र.१) यांच्या साक्षीचा आधार घेतला. अभियोग पक्षाचे हकीकतीनुसार संबंधित लिलाव प्रक्रियेमध्ये गोपाळ कुंभार यांनी ४९,०००/– साठी बोली लागली होती व तेवढी बोली लावलेली असून देखील रक्कम रु. ३७,२८५/– या कमी किंमतीला विजय भोसले यांना ते क्षेत्र संस्थेने विकले. गोपाळ (सा.क्र.८) यांनी अभियोग पक्षाचे हकीकतीला दुजोरा दिला नाही व लिलाव प्रक्रियेमध्ये भाग घेतल्याचे स्पष्टपणे नाकारले.

३६. खोटी कागदपत्रे जर झाली असती तर अभियोग पक्षाने खोटी कागदपत्रे केली आहेत हे सिद्ध करणे केवळ पुरेसे नाही तर आरोपी यांनी ती कागदपत्रे तयार केली आहेत हे संशयापलीकडे सिद्ध करणे गरजेचे आहे. लिलाव प्रक्रियेतील खोट्या कागदपत्रांवर आरोपींनी सह्या केल्या अथवा त्यांनी त्यांच्या हस्ताक्षरात ती कागदपत्रे बनविली अथवा आरोपींपैकी नेमक्या कोणत्या आरोपीने ती कागदपत्रे त्याच्या हस्ताक्षरात बनविली या कामी हस्ताक्षर तज्ञाकडे कागदपत्र पडताळणीस पाठविली आहेत अशी अभियोग पक्षाची केस नाही व त्यामुळे हस्ताक्षर तज्ञाचा अहवाल येण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. हस्ताक्षर तज्ञाकडे प्रस्तुतची कागदपत्रे न पाठविल्याने देखील संशयाला वाव मिळतो, कारण, आरोपींपैकी कोणत्या आरोपीने कागदपत्रे बनविली हे

संशयापलीकडे सिद्ध होणे गरजेचे आहे. सदरकामी मी पुढील न्यायनिर्णयाचा आधार घेत आहे.

अ)**<u>शरद शंकरराव बोंडे वि. महाराष्ट्र सरकार, फौ. रिव्ही. अर्ज क्र. २१५/२००४, निकाल दि. २८ मार्च, २०२३</u>** या न्यायनिर्णयात आदरणीय उच्च न्यायालय, मुंबई यांनी असे म्हटले आहे की, जेव्हा खोटी कागदपत्रे ही आरोपीनेच तयार केली आहेत हे संशयापलीकडे सिद्ध हात नसेल व हस्ताक्षर तज्ञाचा अहवालदेखील सादर केला नसेल व आरोपींनी सह्या केल्या आहेत हे संशयापलीकडे सिद्ध होत नसेल व तपासात काही त्रुटी दिसून येत असतील तर आरोपीला निर्दोष करणे उचित होईल.

ब)**<u>शिला सबॅस्टीयन वि. आर. जवाहर राज (२०१८) ७ एस.सी.सी. ५८१,</u>** सदर न्यायनिर्णयात आदरणीय सर्वोच्च न्यायालय यांनी भा. दं. वि. कलम ४६३ व ४६४ च्या तरतुदी विचारात घेवून असे स्पष्टपणे म्हटले आहे की, खोटी कागदपत्रे तयार केली हा गुन्हा सिद्ध करणेकामी आरोपींना तोपर्यंत दोषी ठरवता येणार नाही जोपर्यंत ते खोटे कागदपत्र आरोपींनीच तयार केले हे संशयापलीकडे सिद्ध होत नाही तोपर्यंत. थोडयात, सांगायचे झालेस जी कागदपत्रे तयार करणेत आली ती आरोपींनीच तयार केली हे जोपर्यंत संशयापलीकडे सिद्ध होत नाही तोपर्यंत आरोपींना दोषी ठरवता येणार नाही.

३७. थोडक्यात सांगायचे झाल्यास हस्ताक्षर तज्ञाचा अहवाल प्रस्तुत

प्रकरणात दाखल नाही. आरोपींपैकी नेमके कोणत्या आरोपीने लिलाव प्रक्रियेचे रजिस्टर अथवा अन्य कागदपत्रे त्याच्या हस्ताक्षरात बनविली, या बाबी संशयापलीकडे अभियोग पक्षाने सिद्ध केलेल्या नाहीत व या आधी नमूद केल्याप्रमाणे आरोपींनी ठकवणूक (cheating) केली आहे, हे संशयापलकडे सिद्ध होत नाही व आरोपींनी संगणमत करुन खोटी कागदपत्र बनविली, असे देखील संशयापलकडे सिद्ध होत नाही. त्यामुळे खोटी कागदपत्र ठकवणूक करण्यासाठी बनविली त्यासाठी भा.दं.वि.कलम ४६८ चा अपराध संशयापलकडे सिद्ध करण्यामागे अभियोग पक्ष यशस्वी झालेला नाही, असे या न्यायालयाचे मत आहे.

३८. अभियोग पक्षाचे हकीकतीनुसार आरोपींनी लिलाव प्रक्रियेतील खोटे कागदपत्रांचा वापर करुन विजय (सा.क्र.५) यांना सि.स.नं.१७६ मधील काही क्षेत्र विकले. या आधी नमूद केल्याप्रमाणे खोटी कागदपत्रे आरोपींनी ठकवणूकीसाठी वापरली हे संशयापलीकडे सिद्ध होत नाही, असे या न्यायालयाचे मत आहे, परंतु, जरी कागदपत्रे खोटी आहेत असे जरी क्षणापुरते ग्राह्य मानले तरी अभियोग पक्षाने भा.दं.वि.कलम ४७१ बाबतीत आरोपीला दोषी ठरवायचे झाल्यास आरोपींनी केलेले कृत्य हे अप्रामाणिक हेतूने (dishonest intention) अथवा कपटीपणाने (fraudulently) केले आहे व खोटे कागदपत्र वापरताना अथवा खोट्या कागदपत्रांचा वापर करताना त्याची माहिती होती की ते कागदपत्र खोटी आहेत, याबाबी जोपर्यंत संशयापलीकडे सिद्ध होत नाही तोपर्यंत आरोपीला दोषी ठरविता येणार नाही.

या आधी नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रे खोटी आहेत, हे अभियोग पक्षाने सिद्ध करणे पुरेसे नाही तर आरोपींनीच ती कागदपत्रे बनविली आहेत हे संशयापलीकडे सिद्ध होणे गरजेचे आहे व त्यामध्ये अभियोग पक्ष अपयशी झाला आहे व त्यामुळे लिलावाची कागदपत्रे खोटी आहेत हे आरोपींना माहिती होते, असे म्हणता येणार नाही, कारण, या आधी नमूद केल्याप्रमाणे अप्रामाणिक हेतूने अथवा कपटीपणाने विजय (सा.क्र.५) याला जमीन विकून संस्था चालकांना काही फायदा झाला याबाबत कोणताही सबळ पुरावा अभियोग पक्षाने दाखल केलेला नाही अथवा अशी देखील अभियोग पक्षाची केस नाही की, विजय (सा.क्र.५) यांना कमी किंमतीला विकून आरोपींनी संस्था चालक या नात्याने कोणता तरी फायदा कमावला की ज्यावरून अप्रामाणिक अथवा कपटीपणाचा हेतू आरोपींचा होता असे म्हणता आले असते, परंतु, तशी अभियोग पक्षाची केस नाही अथवा तसा आरोप नाही. या आधी नमूद केल्याप्रमाणे ती कागदपत्रे ती तपासणीसाठी पाठविली नाहीत. आरोपींपैकी कोणत्या आरोपीने नेमकी ती कागदपत्रे स्वतःच्या हस्ताक्षरात लिहिली व अन्य आरोपींनी संगणमताने त्यास दुजोरा दिला, असा सबळ पुरावा आला नाही की ज्यावरून भा.दं.वि.कलम ३४ नुसार दोषी ठरविता आले असते, अशा परिस्थितीत लिलाव प्रक्रियेतील कागदपत्रे ही बेकायदेशीर आहेत याची माहिती आरोपींना होती असे म्हणता येणार नाही व त्यानंतर लिलावामध्ये जे खरेदीखत विजय (सा.क्र.५) यांच्या लाभात करुन दिले त्यावेळी ते लिलाव प्रक्रियेचे कागद हे खोटे आहेत हे आरोपींना माहिती होते, असे म्हणणे उचित होणार नाही.

त्यामुळे भा.दं.वि.कलम ४७१ बाबतचा अपराध सिद्ध होत नाही असे म्हणावे लागेल.

३९. अभियोग पक्षातर्फे विद्वान विधिज्ञ यांनी **करणवीर** या आधार घेतलेल्या प्रमाण या कामी अभियोग पक्षाला उपयोगी पडत नाही कारण, आरोपींनी अप्रामाणिक (dishonestly) हेतूने अथवा कपटीपणाने (fraudulently) ते कृत्य केले आहे, हे सिद्ध होत नसल्याने सुरूवातीचे ओझे (initial burden) हे अभियोग पक्षाने पार पाडलेले नाही. त्यामुळे सबळरित्या स्पष्टीकरण देण्याची आवश्यकता नाही. अभियोग पक्षातर्फे **कृष्णकुमार व जयकृष्णदास** या न्यायनिर्णयाचे अवलोकन केले, परंतु, त्या न्यानिर्णयातील प्रमाणाचा आदर राखून या न्यायालयाचे असे मत आहे की, त्या न्यायनिर्णयाचे प्रमाण अभियोग पक्षाचे हकीकतीला उपयोगी पडत नाही.

४०. एकंदरीत अभियोग पक्षाने आरोपींनी संस्थेची अथवा ठेवीदारांची ठकवणूक केली अथव फौजदारी न्यासभंग केला अथवा आगळीक केली अथवा खोटी कागदपत्रे तयार केली अथवा ती वापरली या सर्व गोष्टी संशयापलीकडे सिद्ध होत नसल्याने त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ते ६ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

**मुद्दा क्र.७ करीता** –

४१. मुद्दा क्र.१ ते ६ करीता मी माझे निष्कर्ष नकारात्मक नोंदवलेले आहेत. आरोपीवरील आरोप अभियोग पक्षाने रास्त संशयापलिकडे सिध्द केलेले नाहीत. त्यामुळे आरोपी संशयाचा फायदा मिळणेस पात्र आहेत. सबब, आरोपी त्यांच्यावरील आरोपामधुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. जप्त मुद्देमालापैकी संबंधित लेखापरिक्षण

अहवालाच्या सत्यप्रती करण्यात याव्यात व त्या अभिलेखाकामी ठेवण्यात याव्यात व दाखल केलेल्या प्रती या मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कोल्हापूर यांना अपील कालावधी संपल्यावर माघारी देण्यात याव्यात. अभियोग पक्षाचे हकीकतीनुसार श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. शेणगाव, ता. भुदरगड ही पतसंस्था भेडसगावा नागरी सहकारी पतसंस्था मर्या. ता. शाहुवाडी या संस्थेत विलीन झाली आहे. त्यामुळे संबधित सर्व अन्य सर्व कागदपत्रे भेडसगाव नागरी सहकारी पतसंस्था मर्या. ता. शाहुवाडी यांना अपील कालावधीनंतर देण्यात याव्यात. वरील सर्व कारणांच्या विवेचनावरुन, मुद्दा क्र.७ चे निष्कर्षाकरीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१) आरोपी क्र.३ गुरूदत्त श्रीपतराव म्हांगोरे, क्र.७ सुरेश राजाराम कालेकर, क्र.८ सुंदर शिवाजी जाधव, क्र.९ सावित्री पंडित साळोखे, क्र.१० शोभाताई ज्ञानदेव आमनगी व क्र.११ अशोक पांडुरंग मांडे यांची भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ४०६, ४०८, ४२०, ४२७, ४६८ व ४७१ या शिक्षापात्र गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२) आरोपी क्र. ३ व आरोपी क्र.७ ते ११ यांचे बंधपत्र व जामीनकतबा रद्द करण्यात येत आहे.

३) आरोपी क्र. ३ व आरोपी क्र.७ ते ११ यांना फौजदारी प्रक्रिया संहिता चे

कलम ४३७(अ) अन्वये या न्यायालयाचे न्यायनिर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपिल अथवा अर्ज दाखल झाल्यास त्यांचेसमोर हजर राहाण्याकरीता सहा महिन्यांच्या कालावधीकरीता रक्कम रु.५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र द्यावे.

४) जप्त मुद्देमालापैकी संबंधित लेखापरिक्षण अहवालाच्या सत्यप्रती करण्यात याव्यात व त्या अभिलेखाकामी ठेवण्यात याव्यात व दाखल केलेल्या प्रती या मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कोल्हापूर यांना अपील कालावधी संपल्यावर माघारी देण्यात याव्यात.

५ जप्त मुद्देमालापैकी लेखापरिक्षण अहवाल वगळता जप्त केलेली सर्व रजिस्टर अथवा अन्य कागदपत्र ही अपील कालावधी संपल्यानंतर भेडसगाव, नागरी सहकारी पतसंस्था मर्या. ता. शाहुवाडी यांना देण्यात याव्यात.

( खुल्या न्यायालयात जाहीर व उदघोषित करण्यात आला.)

NISHANT DIPAK RUDRABHATE

Digitally signed by NISHANT DIPAK RUDRABHATE
Date: 2026.06.04 19:11:15 +0530

**( एन. डी. रुद्रभटे )**

दिनांक – ०४/०६/२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, गारगोटी